

# डॉ. रविन्द्र कडु यांची राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेवर नियुक्ती

राष्ट्रीय स्तरावरील अध्यापक शिक्षा परिषद (NCTE) या शिखर संस्थेव्दारा अखिल भारतीय स्तरावर देशातील सर्व अध्यापक शिक्षण संस्थांचे शैक्षणिक व प्रशासकीय नियमन केल्या जाते. या राष्ट्रीय संस्थेवर भारत सरकार व्दारा प्राचार्य डॉ. रविन्द्र महादेवराव कडु यांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे. तसेच या शिखर परिषदेच्या पश्चिम क्षेत्रीय समितीचे अध्यक्ष म्हणुन त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. देशातील चार क्षेत्रीय समिती पैकी पश्चिम क्षेत्रीय समितीमध्ये एकंदर पाच राज्य व दोन केंद्रशाषित  प्रदेशातील सर्व अध्यापक शिक्षण संस्थानांचा समावेश आहे.

प्राचार्य रविन्द्र कडु यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील विविध प्रधिकारीणीवर कार्य केले असुन सध्या विद्यापीठाच्या समितीवर मा.राज्यपालांचे नमित सदस्य आहेत.

सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ.रविन्द्र कडु यांचे निवडी बद्दल सर्व शैक्षणिक क्षेत्रातील वर्गाकडुन अभिनंदन करण्यात येत आहे.  या निवडीचे श्रेय त्यांचे शिक्षण क्षेत्रातील सर्व सहकारी, मित्र मंडळी व कुटुंबियांना देतात.